# अन्नपूर्णा-कहाणी एका धान्यबँकेची







# अन्नपूर्णा-कहाणी एका धान्यबँकेची (वेळ ४५ मि.)

दारफळ, सोलापूर जिल्ह्यातलं 'लहरी' पावसावर अवलंबून असलेलं एक गाव. एखाद्या गावाची अशी ओळख काही नवी नाही. पण या गावात 'अन्नपूर्णेचं जागृत ठाणं' आहे; देवळाच्या नव्हे तर धान्यबँकेच्या रूपात ! चाळीस वर्षांपूर्वी या परिसरात जयप्रकाश नारायण, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे आले. त्यांनी ग्रामविकासाचं महत्त्वं सांगितलं आणि दुष्काळ, सावकारशाही, बेरोजगारी यांना कंटाळलेल्या गावकऱ्यांनी धान्यबँक स्थापण्याचा निर्णय घेतला.

आजतागायत विनातक्रार, कुणाच्याही अर्थसहाय्याशिवाय हे काम सुरू आहे. अगदी एक्काहत्तरच्या दुष्काळातही गावाला धान्यटंचाई जाणवली नाही! गावातल्या सुधारणा व इतर सामाजिक कामांना बँकेतल्या 'मालदांडी'चा आधार आहे. 'धान्यबँकेचे हित ते आपलं हित' हे तत्त्व पुरतं जाणून, गावकरी 'बँके'च्या वाढीसाठी सतत झटतात. अफार्मने या कामाचं महत्त्वव जाणलं, अभ्यासलं आणि त्याचा व्यापक प्रचार सुरू केला.

दुष्काळातून निर्माण झालेली आणि या प्रश्नी उभी राहिलेली दोन कामं एकत्र आली. एक स्वयंसेवी संस्थांचं व्यासपीठ तर दुसरं लोकशक्तीचं अधिष्टान.

या कसदार कामाचा अफार्मनं, धान्य व्यवस्थापन, अन्नसुरक्षितता अशा शास्त्रीय गोष्टींची जोड दिली. तर दारफळनं, स्वावलंबी कामाचा आदर्श सर्वांसाठी खुला केला. या सहकार्यातून चित्रित झालेलं अन्नपूर्णेचं हे आगळं 'रूप', गावागावात अशी 'लोकशक्तीपीठ' उभी करण्यासाठी 'लोचनी पहावं' असंच आहे.


**ॲक्शन फॉर ॲग्रिकल्चरल रिन्युअल इन महाराष्ट्र (अफार्म),**
२/२३, अ-ब, रायसोनी पार्क, मार्केट यार्ड, पुणे - ४११ ०३७.
• फोन नं. : (०२०) २४२६४६४१ • फॅक्स : (०२०) २४२६६३०३
• ई-मेल : afarm@vsnl.com • वेबसाईट : www.afarm.org